**सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण विद्या शाखा,**
**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला -४४४१०४**

**डॉ.बी.व्ही. सावजी**
सहयोगी अधिष्ठाता

ई-मेल-**adlae@pdkv.ac.in**
भ्रमणध्वनी क्र.-९९६०७१६३४२

क्रं.सअ / निकृशि / २८८ /२०२२
दिनांक - २६/०७/२०२२

प्रती,

प्राचार्य सर्व
घटक/ खाजगी , कृषि तंत्र विद्यालय
सर्व

विषय : कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सूचनेस प्रसिद्धी देणेबाबत....

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दिनांक २६/०७/२०२२ पासून ऑनलाइन पद्धतीने सुरू झाली असून सदर प्रवेश प्रक्रिया जाहिरात विद्यापीठामार्फत विदर्भ स्तरावर प्रसिद्धीसाठी देण्यात आली आहे.

तरी आपणास सूचित करण्यात येते की, **आपल्या स्तरावर सुद्धा सदर जाहिरातीस वृतपत्र/वाट्स्प ग्रुप/स्थानिक केबल नेटवर्क, इत्यादि प्रकारे जास्तीत जास्त प्रसिध्दी देऊन सदर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेची माहिती सर्व गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहचेल याची काळजी घ्यावी जेणेकरून त्यांना सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याची संधी मिळेल. करिता जाहिरातीची प्रत आपल्या माहितीसाठी सोबत जोडलेली** आहे.

आपल्या स्तरावर प्रसिद्धी दिल्यानंतर सदर जाहिरातीचे कात्रण या कार्यालयात विनाविलंब **दिनांक-१०/०८/२०२२** पूर्वी सादर करावे जेणेकरून वरिष्ठ स्तरावर सदर अहवाल वेळीच सादर करणे सोयीचे होईल.

पुढील त्वरित कार्यवाही करिता रवाना.

**टीप : या नियमित प्रवेश फेरी नंतर कोणतीही अतिरिक्त प्रवेश फेरी होणार नाही याची नोंद घ्यावी.**

प्रवेश प्रक्रियेचा तांत्रिक महितीसाठी **Helpline No. 96878 00166** वर संपर्क करावा.

**सोबत : १. जाहिरातीची प्रत**
**२. वेबसाइट- https://www.pdkv.ac.in**

सहयोगी अधिष्ठाता
निम्न कृषि शिक्षण विद्याशाखा
डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला

प्रतिलिपी

१) मा. संचालक (शिक्षण) तथा अधिष्ठाता (कृषि), डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला यांना माहितीकरिता सविनय सादर
२) मा. कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला.यांचे अवलोकनार्थ सविनय सादर.
३) मा. कुलगुरू यांचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरू यांचे अवलोकनार्थ सविनय सादर .

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखा
### कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (दोन वर्ष, मराठी माध्यम) प्रवेश सुचना

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला कार्यक्षेत्राअंतर्गत शैक्षणिक सत्र २०२२-२३ मधील कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (दोन वर्ष, मराठी माध्यम) प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे मार्फत राबविण्यात येत आहे.

**अभ्यासक्रम व प्रवेश पात्रता**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | पात्रता |
|---|---|---|---|
| १. | कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्ष | उमेदवार महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ.१०वी ) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा. |

डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत निकृशि विद्याशाखेच्या कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक सत्र २०२२-२३ मधील प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पध्दतीने पूर्ण करण्यात येणार आहे. **याकरिता आवश्यक प्रवेश माहिती पुस्तिका तसेच अर्ज भरण्याची लिंक डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोलाचे संकेतस्थळ https://www.pdkv.ac.in यावर दिनांक २६/०७/२०२२ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबायची कार्यपद्धती**

- उमेदवाराने **https://www.pdkv.ac.in** या संकेतस्थळाद्वारे **ऑनलाइन प्रवेश अर्ज भरण्याची लिंक दिनांक १७/०८/२०२२** पर्यन्त उपलब्ध राहील. या नंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध नसेल.
- ऑनलाइन अर्ज भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे (रंगीत) छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी,संबंधीत मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- **प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे स्वतः/ईतराद्वारे /टपालाने/कुरीयरने कार्यालयाला पाठवू नयेत.**
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश शुल्क डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग किंवा UPI (Unified Payment Interface) द्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरवायचे शुल्क**

- खुल्या प्रवर्गाकरिता रु. ५००/-, आरक्षित प्रवर्गाकरिता रु. २५०/- (अ.जा./अ.ज./वि.जा.*/भ.ज.*/इ.मा.व.*/वि. मा.व.*) ( *उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.)

  प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशीलाचा अंतर्भाव असलेली कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (२वर्ष-मराठी माध्यम) प्रवेश माहिती पुस्तिका शैक्षणिक सत्र २०२२-२३ उपरोक्त संकेतस्थळावर दि. २६ जुलै, २०२२ पासून उपलब्ध आहे.

कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला